**CNR No.MHSI01000517-2020** भास्कर वि. किरण

## निशाणी ६७ खालील आदेश

अपेलंट यांनी रिस्पॉडेंट नं. २(१) यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी विलंबमाफीचा अर्ज दाखल केलेला आहे. सदर अर्जावर रिस्पॉडेंट नं. २ यांनी म्हणणे दाखल करून विरोध केलेला आहे. अपेलंट व रिस्पॉडंट यांच्या विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकला. उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले.

२. अपेलंटचे अर्जामध्ये कथन की, रिस्पॉडेंट नं. २(१) रेश्मा रामचंद्र तेली ह्या दि. २४/११/२०२२ रोजी मरण पावलेल्या आहेत. त्या मरण पावल्याची माहिती अपिलार्थी यांना नव्हती. अपिलार्थी यांना मयताच्या मृत्युबाबतची नोंद कोणत्या गावातील जन्ममृत्यु नोंद प्राधिकरण अधिकारी अथवा ग्रापंचायतीत घातली याची कल्पना नसल्याने कागदपत्रे मिळवण्यास उशीर झाला. मयताच्या कायदेशीर वारसांची कागदपत्रे योग्य वेळेत न मिळाल्यामुळे वारस दाखल करण्यास विलंब झालेला आहे. सबब वेळेत वारस अपिलामध्ये दाखल न झाल्यामुळे रिस्पॉडेंट नं. २(१) च्या विरूध्द अबेट झालेले आहे. आदेश रद्द न झाल्यास रिस्पॉडेंट नं. २(१) चे पैशाच्या स्वरूपात न भरून येणारे नुकसान होणारे आहे. सदर झालेला आदेश हा अपिलंट यांच्या निष्काळजीपणामुळे झालेला नसल्याने न्यायाच्या दृष्टीने तो मंजूर करावा अशी विनंती केली आहे.

३. रिस्पॉडंट यांनी अर्जावर म्हणणे दाखल करून विरोध केलेला आहे की, अर्ज खोटा व खेडसाळ स्वरूपाचा असून विलंबाने दाखल केलेला आहे. अर्जास

योग्य व संयुक्तिक कारण नसून त्याबाबत कोणताही पुरावा पटलावर उपलब्ध नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करावा.

४. अपेलंट यांचा अर्ज, त्यावरील रिस्पॉडंट याचे म्हणणे याचा विचार करता अपेलंट यांनी रिस्पॉडेंट नं. २(१) यांचे वारस वेळेत अपिलामध्ये समाविष्ट केलेले नाही. अपेलंट यांचे अर्जामध्ये कथन की मयता बाबत माहिती उपलब्ध झाली नव्हती. रिस्पॉडेंट नं. २ (१) यांचे वारस सदर अपिल न्याय निर्णय करण्यासाठी आवश्यक पक्षकार आहेत. सदर पक्षकार समाविष्ट केल्याशिवाय गुणदोषावर अपिल चालण्यास अडथळा निर्माण होणार आहे. त्यामुळे अपेलंट याने दिलेले कारण योग्य व संयुक्तिक असल्यामुळे मी खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

**आदेश**

१. अपेलंट यांचा निशाणी ६७ वरील अर्ज हा मंजूर करण्यात येत आहे.

२. अपेलंट यांच्या विरूध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यात येत आहे.

SURYAKANT SHANKARRAO INDALKAR

Digitally signed by SURYAKANT SHANKARRAO INDALKAR
Date: 2025.12.03 16:58:05 +0530

( एस. एस. इंदलकर )
तदर्थ जिल्हा न्यायाधीश–१ व
अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
सिंधुदुर्ग – ओरोस.

सिंधुदुर्ग–ओरोस.
दिनांक : ०३/१२/२०२५